महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक , अहिल्यानगर यांचे कार्यालय,
" वनभवन " नगर छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर - ४१४ ००१

दूरध्वनी क्र: ०२४१-२३२६१४२ ई-मेल : dcfanagar@gmail.com

---

क्रमांक : ब /आस्था/कक्ष १२/1078 /सन २०२४.२५. अहमदनगर - दिनांक :- 18 /०२/२०२५.
पत्र
प्रति,

1) मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर
2) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक अहिल्यानगर

**विषय:- वनरक्षक व वनपाल यांना गुन्ह्याचे तपासकामी नेमणेबाबत.**

**संदर्भ:-**
**1) महाराष्ट्र राज्य पदोन्नत वनरक्षक व वनपाल संघटना महाराष्ट्र राज्य यांची दिनांक 10.02.2025 रोजी उपवनसंरक्षक कार्यालय अहिल्यानगर यांचे दालनामध्ये झालेली बैठक**
**2) महाराष्ट्र वननियमावली , 2014 नियम 79**

विषयांकीत प्रकरणी, खालील स्वाक्षरीकर्ते यांचे दालनामध्ये दिनांक 10.02.2025 रोजी महाराष्ट्र राज्य पदोन्नत वनरक्षक व वनपाल संघटना महाराष्ट्र राज्य संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष अजय पाटील व संघटनेचे इतर पदाधिकारी यांचे समवेत उपवनसंरक्षक कार्यालय अहिल्यानगर येथे अहिल्यानगर वनविभागामधिल कर्मचारी यांचे अडीअडचणी संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संघटनेने असे नमुद केले आहे की, वनपाल व वनरक्षक यांना कूठल्याही प्रकारचे गुन्ह्यासाठी सरकारी पंच म्हणून संदर्भ क्रमांक 2 अन्वये, पाठविण्यात येवू नये. वन, वन्यजीव, जैवविविधता, पर्यावरण यांचे संरक्षण व संवर्धन आणि वनक्षेत्र व वृक्षाच्छादन वाढविण्यासाठी वनविभागातील वनरक्षक व वनपाल हे आघाडीचे कर्मचारी आहेत.

तदअनुषंगाने, उपरोक्त संदर्भ क्रमांक 2 मधिल महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ, असाधारण क्रमांक 35 दिनांक 26.02.2014 अन्वये, महाराष्ट्र वन नियमावली, 2014 प्रकाशीत झालेली असून नियम क्रमांक 79 मध्ये खालीलप्रमाणे नमुद करण्यात आले आहे.

वनरक्षकाने, महसूल किंवा पोलीस अधिका-यांकडे हजर होण्यासाठी नियतक्षेत्र सोडू नये - कोणताही महसूल किंवा पोलीस अधिकारी, वनरक्षकास त्याच्या नियतक्षेत्राबाहेर बोलविणार नाही किंवा वनरक्षक हे महसूल अथवा पोलीस अधिकारी यांचेकडे हजर होण्यासाठी नियतक्षेत्र सोडणार नाहीत. असे नमुद केले असल्यामुळे कृपया अहमदनगर वनविभागामधिल वनपाल व वनरक्षक यांना कोणत्याही प्रकारचे शासकीय गुन्ह्यामध्ये सरकारी पंच म्हणून नेमणूक करण्यात येवू नये या बाबत आपण आपले अधिनस्थ कार्यालय यांना सुचीत करावे ही, विनंती.

**सहपत्र - महाराष्ट्र वननियमावली , 2014 नियम 79**

(धर्मवीर सालविठ्ठल ) **भा.व.से.**
**उपवनसंरक्षक**
**वनविभाग अहिल्यानगर**

**प्रतिलीपी :-** विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण अहिल्यानगर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठ रवाना.



आवक लिपीक
पोलीस अधिक्षक कार्यालय
अहिल्यानगर

महसूल सहायक
आवक पोल विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर
20.2.25